

# केसबुक ऑफ शेरलॉक होम्स


सर ऑर्थर कॉनन डायल

अनुवाद

विलास फडके



रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com



**केसबुक ऑफ शेरलॉक होम्स :** सर ऑर्थर कॉनन डायल
अनुवाद : विलास फडके

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
विलास फडके

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

# अनुक्रमणिका


१. विषारी मदनबाण (दि ॲडव्हेंचर ऑफ इलस्ट्रिअस क्लायंट) ......... ५

२. दिवाभीत (दि ॲडव्हेंचर ऑफ दि ब्लेंड सोल्जर) .................. २८

३. खानदानी डाकू (दि ॲडव्हेंचर ऑफ दि मॅझॅरिन स्टोन) ............ ४६

४. सारं काही मित्रासाठी (दि ॲडव्हेंचर ऑफ दि थ्री गेबल्स)........... ६२

५. रक्तपिपासू (दि ॲडव्हेंचर ऑफ सेक्स व्हंपायर) ................... ७८

६. तिसरा गॅरिडेब (दि ॲडव्हेंचर ऑफ थ्री गॅरिडेब्स)................... ९४

७. पुलावरील गूढ (दि ॲडव्हेंचर ऑफ थोर ब्रिज).................... १०९

८. म्हातारचळ (दि ॲडव्हेंचर ऑफ क्रोपिंग मॅन) ...................... १३३

९. अपराधी कोण? (दि ॲडव्हेंचर ऑफ लायन्स मेन) ................. १५१

१०. कुणाला सांगू माझी कथा (दि ॲडव्हेंचर ऑफ दि व्हेल्ड लॉजर) ... १६८

११. शर्यत नशिबाशी (दि ॲडव्हेंचर ऑफ शोकोम्ब ओल्ड प्लेस) ...... १७९

१२. रंगरंगोटी (दि ॲडव्हेंचर ऑफ दि रिटायर्ड कलरमॅन) ............... १९५


✦✦✦


SHERLOCK

# *विषारी मदनबाण*

**दि ॲडव्हेंचर ऑफ इलस्ट्रिअस क्लायंट**

गेली काही वर्षे अनेक वेळा विनंती करून झाल्यावर अखेर शेरलॉक होम्सनं हे प्रकरण वाचकांसमोर मांडण्यास परवानगी दिली. तो आपल्या कारकिर्दीच्या सर्वोच्च शिखरावर होता त्या काळातलं हे प्रकरण आहे.

होम्सला आणि मला दोघांनाही टर्किश बाथ घेण्याचा शौक! त्या दिवशी असंच स्नान करून झाल्यावर वरच्या मजल्यावर अंग सुकवत बसलो होतो. एकीकडे धूम्रपान व वर्तमानपत्र वाचणं चालू होतंच. तो दिवस होता ३ सप्टेंबर १९०२. मी सहज त्याला अलीकडे काय काम चालू आहे असं विचारलं– उत्तरादाखल त्यानं आपला हात लांब केला आणि हाताशी असलेल्या कोटाच्या खिशातून एक लखोटा काढून माझ्या हातात ठेवला.

''हा एक मूर्खपणा असेल किंवा जीवनमरणाचा प्रश्न तरी!'' तो लखोटा देता देता म्हणाला. ''सध्या तरी मला त्या मजकुरावरून काहीच सांगता येत नाही.''

ते पत्र कार्लटन क्लबवरून आलं होतं आणि आदल्या दिवशी संध्याकाळी पाठवण्यात आलं होतं. त्यात मजकूर होता –

'सर जेम्स डॅमरी यांचेकडून शेरलॉक होम्स यांना शुभेच्छा! ते उद्या ४.३० वाजता होम्सना भेटण्यासाठी येत आहेत. त्यांचं काम अत्यंत महत्त्वाचं व तितकंच नाजूकही आहे म्हणून श्री. होम्स यांनी यावेळी जरूर हजर राहावं आणि तसं कार्लटन क्लबवर फोन करून कळवावं.''

''मी हजर राहात असल्याबद्दल कळवलं आहेच,'' माझ्या हातून लखोटा परत घेत असताना होम्स म्हणाला, ''तुला या डॅमरींबद्दल काही माहिती आहे?''

''इंग्लंडमधील वरच्या वर्तुळात त्यांचं नाव वारंवार घेतलं जातं!''

''मग मी तुला थोडी आणखी माहिती देतो. नाजूक प्रकरणांचा गवगवा होऊन देण्याबाबत त्याची ख्याती आहे. हॅमरफिल्ड विल प्रकरणात त्यानं सर जॉर्ज लेविस यांच्यासाठी बजावलेली कामगिरी आठव. यशस्वी वाटाघाटी करण्याबद्दल तो प्रसिद्ध आहे. हे प्रकरण फार गंभीर असणार म्हणून तो आपली मदत मागण्यासाठी येतो आहे.''

''आपली मदत?''

''अर्थात तुझी तयारी असली तर!''

''मला आनंदच वाटेल.''

''मग साडेचार ही वेळ लक्षात ठेव! तोपर्यंत आपण हा विषय डोक्यातून काढून टाकू!''

✦

ही घटना घडली त्यावेळी मी क्वीन ॲने स्ट्रीटवर स्वतंत्र खोली घेऊन राहात होतो; पण ठरलेल्या वेळेपूर्वी मी बेकर स्ट्रीटवर हजर झालो. बरोबर साडेचार वाजता सर जेम्स डॅमरी येऊन दाखल झाले. अंगानं उंच-नीच, गुळगुळीत दाढी केलेला रुंद चेहरा असं त्यांचं व्यक्तिमत्त्व सर्वांच्या परिचयाचं होतं. त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भरदार; पण गोड आवाज. ते हसतमुख तर होतेच; पण नजरेवरून मोकळ्या स्वभावाचे आहेत असं वाटत होतं. त्यांनी टॉप हॅट, काळा फ्रॉककोट, मखमली जाकिटावर मोती जडवलेली पिन आणि चमकदार बूट असा उंची आणि नीटनेटका पेहराव केला होता. त्यांच्या खानदानी व्यक्तिमत्त्वामुळे खोलीला शोभा आली.

''डॉ. वॅटसनही इथे असणार याची मला खात्री होतीच.'' ते अदबीनं वाकून म्हणाले. ''या प्रकरणात त्यांचीही मदत आवश्यक आहेच. मि. होम्स, आपण प्रकरणात कोणतीही कसूर ठेवत नाही, प्रसंगी हिंसाचाराला तोंड देण्याचीही आपली तयारी असते याची मला कल्पना आहे. यावेळी आपली गाठ युरोपमधील अत्यंत धोकेबाज इसमाशी आहे.''

''आत्तापर्यंत मी अशा कितीतरी धोकेबाज इसमांशी यशस्वी सामना केला आहे.'' होम्स हसून म्हणाला. ''आपला हा शत्रू प्रोफेसर मॉरिसार्टी किंवा कर्नल सेबॅस्टिअन मोरॅनपेक्षाही जास्त धोकेबाज असेल तर त्याच्याशी दोन हात करायला मजाच येईल. या इसमाचं नाव तरी काय?''

''आपण कधी बॅरन ग्रूनर हे नाव ऐकलं आहे?''

''म्हणजे तो ऑस्ट्रियन खुनी?''

यावर कर्नल डॅमरी यांनी हसून आपला हात पुढे केला. ''खरंच होम्स, तुम्हाला हरवणं फार कठीण आहे. तुम्ही त्याला खुनीही ठरवून मोकळे झालात?''

''आपल्या खंडात घडणाऱ्या गुन्ह्यांची तपशीलवार माहिती ठेवणं हा माझ्या कामाचाच भाग आहे. प्रागमध्ये घडलेला प्रकार ज्यानं वाचला आहे तो या माणसाला खुनी म्हणूनच ओळखणार. केवळ संशयाचा फायदा मिळाल्यामुळे तो सुटला. तो ज्याला 'अपघात' म्हणतो तो स्पगन पासमधील प्रकार म्हणजे त्यानं आपल्या पत्नीचा केलेला

खूनच आहे. याविषयी मला १०० टक्के खात्री आहे. तो लंडनमध्ये आला आहे आणि आज ना उद्या आपली त्याच्याशी गाठ पडणार याविषयीही खात्री आहे. इथे या ग्रूनरनं काय उद्योग केला? मागल्या दु:खद प्रसंगाशी संबंधित तर काही नाही ना?''

''नाही. हे त्यापेक्षा अधिक गंभीर आहे. झालेल्या गुन्ह्याची शिक्षा देणं योग्य; पण गुन्हा घडण्यापूर्वीच थोपवणं जास्त योग्य असतं. तुमच्या नजरेसमोर एखादा गैरप्रकार घडतो आहे आणि तुम्ही तो थोपवू शकत नाही यासारखी दुर्दैवी गोष्ट नाही होम्स. अशा चिकट परिस्थितीत सापडणं वाईटच नाही का?''

''निश्चितच!''

''याचा अर्थ मी ज्यांच्या वतीनं काम करतो आहे त्यांना तुमची सहानुभूती असणार!''

''म्हणजे आपण इथे प्रतिनिधी म्हणून आला आहात तर! मग खरं काम निश्चित कुणाचं आहे?''

''आपण या प्रश्नावर जास्त जोर दिला नाहीत तर अधिक चांगलं होईल, मि. होम्स! मी ज्यांच्या वतीनं आलो आहे त्यांना त्यांचं नाव कुठेही उघड होऊ देणार नाही, असं वचन दिलं आहे. यामागील उद्देश खात्रीनं चांगला आहे. त्यांना प्रसिद्धी नको आहे एवढंच! आपल्या कारवाईवर कोणतीही बंधनं असणार नाहीत, मोबदलाही घसघशीत मिळेल. मग त्या व्यक्तीचं नाव सांगायला हवंच का?''

''माफ करा,'' होम्स म्हणाला. ''कुठल्याही प्रकरणात एका बाजूचं रहस्य सोडवण्याची मला सवय आहे; पण दोन्ही बाजूंची सोडवणं हे काम काहीसं गोंधळ उडवणारं आहे. माफ करा सर जेम्स, मी ही कामगिरी स्वीकारू शकत नाही.''

''आपल्या या निर्णयाचे किती गंभीर परिणाम होणार आहेत याची आपल्याला कल्पना नाही मि. होम्स,'' सर जेम्स खेदानं आणि निराशेनं म्हणाले, ''तुम्ही मला मोठ्याच अडचणीत टाकित आहात. आपल्याला सारी परिस्थिती सांगितली की, आपण ही कामगिरी स्वीकारणारच याविषयी मला खात्री होती; पण काही बंधनांमुळे मी सारा तपशील सांगू शकत नाही– निदान त्यातील काही गोष्टी तरी आपल्याला सांगू शकतो का?''

''जरूर; पण म्हणून मी ही कामगिरी स्वीकारीनच असे नाही हे लक्षात असू द्या!''

''मान्य! आपण जनरल डी मेरव्हिले यांचं नाव ऐकलं असेलच!''

''हो, खैबरखिंडीत पराक्रम गाजवणारे डी मेरव्हिले ना?''

''होय, त्यांना व्हायोलेट नावाची मुलगी आहे. तरुण, श्रीमंत, सुंदर, हुशार अगदी सर्वगुणसंपन्न म्हणाना; पण ही भोळीभाबडी मुलगी एका सैतानाच्या पाशात अडकली आहे.''

''म्हणजे या बॅरन ग्रूनरनं तिच्यावर आपलं जाळं टाकलं आहे तर!''

''होय, प्रेमाचं मजबूत जाळं. हा इसम दिसायला देखणा, रुबाबदार, मधाळ बोलणं आणि हुशारीनं वागणं यासाठी प्रसिद्ध आहे याची तुम्हाला कल्पना आहेच. स्त्रियांना भुरळ पडायला आणखी काय हवं असतं?''

''पण त्याची आणि या व्हायोलेट डी मेरव्हिलेची भेट कुठे आणि कशी झाली?''

''भूमध्य समुद्रावरील एका सफरीत! एका कंपनीनं निवडक लोकांनाच आपल्या जहाजावर घेतलं होतं. त्यांना या बॅरनच्या कर्तबगारीची तेव्हा कल्पना नसावी. या सैतानानं या तरुणीशी जवळीक साधली आणि तिचं मन जिंकून घेतलं. ती त्याच्या प्रेमात पडली आहे असं म्हणण्यापेक्षा त्याच्यासाठी वेडी झाली आहे असं म्हणणं जास्त योग्य होईल. त्याच्याशिवाय जगात दुसरं काही आहे हे तिला मान्यच नाही. त्याच्या विरोधात एक शब्दही ऐकून घेण्यास ती तयार नाही. तिला या वेडापासून परावृत्त करण्याचे अनेक प्रयत्न करून झाले; पण ते सारे फुकट गेले. पुढील महिन्यात त्याच्याशी लग्न करण्याचं तिनं निश्चित केलं आहे. ती सज्ञान आहे आणि शब्दाला पक्की आहे. तिला या संकटापासून कसं रोखायचं हाच बिकट प्रश्न आहे.''

''तिला त्याच्या या आधीच्या कृत्याची माहिती आहे?''

''हो, त्या लबाड कोल्ह्यानं तिला सारा पूर्वेतिहास सांगितला आहे. आपण निरपराध आहोत आणि या निराधार अफवांचे नाहक बळी ठरलो आहोत हे तिला पटवून देण्यात तो यशस्वी झाला आहे. आता ती त्याच्या विरोधात एक शब्दही ऐकून घेण्यास तयार नाही.''

''एकंदरीत परिस्थिती या थराला गेली आहे तर; पण बोलता बोलता तुम्ही जनरल डी मेरव्हिले यांचं नाव घेतलं, त्यांच्याच वतीनं तुम्ही आला आहात ना?''

''नाही म्हणणं म्हणजे तुम्हाला फसवण्यासारखं होईल होम्स! डी मेरव्हिले पार खचून गेले आहेत. एवढा मोठा लढवय्या या घटनेमुळे पार हवालदिल होऊन गेला आहे. रणांगणावर कधीही हार न मानणारा शूरवीर या धूर्त सैतानापुढे हतबल झाला आहे. मी ज्यांच्या वतीनं आलो ते सद्गृहस्थ जनरलसाहेबांचे फार जुने व अत्यंत जवळचे मित्र आहेत. त्यांचा या व्हायोलेटवर तिच्या लहानपणापासून जीव आहे– काहीही प्रयत्न न

करता उघड्या डोळ्यांनी तिच्या भवितव्याचं वाटोळं झालेलं बघणं त्यांना पसंत नाही. स्कॉटलंड यार्ड या प्रकरणात काहीही करू शकत नाही. आपल्याला या प्रकरणात लक्ष घालण्यास सांगावं ही त्यांचीच सूचना; पण आधीच सांगितल्याप्रमाणे त्यांचं नाव या प्रकरणात कुठेही उघड होऊ नये, अशी त्यांची इच्छा आहे. माझ्या मागे ते कोण याचा तुम्ही शोध लावू शकाल याची मला खात्री आहे; पण माझी आपल्याला विनंती आहे की, कृपया तसं काही करू नका, कृपया त्यांची ओळख उघड करू नका!''

यावर होम्स काहीसं विचित्र हसला.

''तशी मी तुम्हाला हमी देऊ शकतो,'' तो म्हणाला, ''दुसरी गोष्ट म्हणजे तुमची समस्या मला महत्त्वाची वाटते आणि मी तिच्यात लक्ष घालण्यास तयार आहे. तुमच्याशी संपर्क साधायचा झाला तर कुठे साधायचा?''

''मी कार्लटन क्लबवर भेटू शकेन. काही तातडीचं काम निघालं तर 'X X ३१' या माझ्या खासगी क्रमांकावर फोन करा!''

अजूनही होम्सच्या चेहऱ्यावर हास्य होतंच. आपल्या गुडघ्यांवर आपली चोपडी उघडून तिच्यात त्यानं तो क्रमांक लिहून घेतला.

''हा बॅरन सध्या कुठे राहतो हे माहीत आहे का?''

''किंग्स्टनजवळ व्हर्नाम लॉजमध्ये. हे घर चांगलं मोठं आहे. भल्याबुऱ्या मार्गानं त्यानं अफाट पैसा मिळवला आहे आणि त्यामुळे त्याची ताकद अधिकच वाढली आहे.''

''तो सध्या तिथेच राहतो का?''

''हो!''

''तुम्ही आत्तापर्यंत सांगितलेल्या माहितीव्यतिरिक्त या इसमाविषयी अधिक काही माहिती सांगू शकाल का?''

''त्याच्या आवडीनिवडी फार खर्चिक आहेत. त्याला घोड्यांचा शौक आहे. हर्लिंगहॅम इथे तो काही दिवस पोलो खेळत असे; पण त्याच्या या प्राग भानगडीचा फारच गवगवा झाला. त्यामुळे त्याला तिथून पळ काढावा लागला. त्याच्याजवळ पुस्तकं आणि चित्रांचा फार मोठा संग्रह आहे. तो स्वत:ही चांगला कलाकार आहे. चिनीमातीच्या वस्तूंचा त्याचा चांगला अभ्यास आहे आणि त्या विषयावर त्यानं एक पुस्तकही लिहिलं आहे.''

''हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व,'' होम्स म्हणाला. ''बरेच मोठे गुन्हेगार असेच असतात. माझा जुना मित्र चार्ली पीस व्हायोलिन उत्कृष्ट वाजवत असे. वेनराईट हासुद्धा सामान्य

कलाकार नव्हता. अशी बरीच नावे सांगता येतील. ठीक आहे सर जेम्स, मी या बॅरन ग्रूनरकडे लक्ष देतो असं आपल्या मित्रांना सांगा. सध्या मी आणखी काही सांगू शकत नाही. माहिती मिळवण्याचे माझे स्वत:चे असे काही मार्ग आहेत. या प्रकरणात काहीतरी मार्ग निश्चितच सापडू शकेल एवढंच आता सांगू शकतो.''

✦

सर जेम्स निघून गेल्यावर होम्स बराच वेळ विचार करीत बसून राहिला. माझं खोलीतील अस्तित्व तो विसरूनच गेला असावा असं मला वाटू लागलं. अखेर एकदाची त्याची तंद्री भंग पावली आणि तो पुन्हा भूतलावर आला.

''काय वॅटसन, तुला काय वाटतं?'' त्यानं विचारलं.

''मला वाटतं तू त्या तरुणीला समक्ष भेटावंस!''

''जिथे तिचा बाप काही करू शकला नाही तिथे माझ्यासारखा तिऱ्हाईत इसम काय करणार? तरीसुद्धा बाकीचे मार्ग वाया गेले तर त्याचा वापर करायला हरकत नाही; पण सध्या जरा वेगळ्या मार्गानं सुरुवात करावी असं मला वाटतं. या बाबतीत शिनवेल जॉन्सनची आपल्याला मदत होऊ शकेल.''

यापूर्वी मी कधी या शिनवेल जॉन्सनचा उल्लेख केला नव्हता कारण तो तसा उशिराच होम्सच्या सान्निध्यात आला. या शतकाच्या सुरुवातीस तो होम्सचा एक अत्यंत महत्त्वाचा सहकारी बनला. सांगायला वाईट वाटतं; पण हा जॉन्सन पूर्वी एक कुविख्यात गुन्हेगार होता. दोन वेळा पार्कहर्स्टच्या तुरुंगातही जाऊन आला होता. पुढे त्याला पश्चात्ताप झाला आणि तो होम्ससाठी काम करू लागला. लंडनच्या गुन्हेगारी विश्वात हिंडून तो भरपूर माहिती मिळवत असे आणि ती बरेच वेळा अत्यंत महत्त्वाची असल्याचं सिद्ध होई. जॉन्सननं पोलिसांचा खबऱ्या म्हणून काम केलं असतं तर तो केव्हाच उघडकीस आला असता; पण त्यानं केलेली कामगिरी थेट कोर्टात कधीच जात नसे. त्यामुळे त्याच्या कारवायांचा त्याच्या पूर्वीच्या सहकाऱ्यांना कधीच पत्ता लागला नाही. आपल्या पूर्वीच्या कीर्तीमुळे त्याला सारे नाईट क्लब, जुगाराचे अड्डे, सामान्य हॉटेल्स सर्वत्र मुक्त प्रवेश असे. निरीक्षणशक्ती आणि तल्लख मेंदू यामुळे तो सहजपणे माहिती मिळवू शकत असे. आता शेरलॉक होम्स त्याच्याचकडे जायचं म्हणत होता.

त्या दिवशी माझ्याकडे रुग्णांची गर्दी असल्याने होम्सच्या मदतीला तातडीनं धावून जाणं मला शक्य नव्हतं; पण मी संध्याकाळी भेटण्याची वेळ निश्चित करून त्याला